महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.३४८/ **०५१५६**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - ६९४२५१४१
दिनांक: **१५.०२.२०२४**

# परिपत्रक

**विषय :-** "छत्रपती शिवाजी महाराज" यांची जयंती दिनांक १९ फेब्रुवारी, २०२४ निमित्त विविध उपक्रमासंदर्भात.

**संदर्भ**:- १. प्रशासकीय परिपत्रक क्र.६६६ दि.०२.०१.२०२४.
२. शासन परिपत्रक क्र. जपुती-२०२४/प्र.क्र.१६/कार्या-जपुक (२९) दि.०५.०२.२०२४.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. जपुती-२०२४/ प्र.क्र.१६/ कार्या-जपुक (२९) दि.०५.०२.२०२४ अन्वये दिनांक १९ फेब्रुवारी, २०२४ या दिवशी "छत्रपती शिवाजी महाराज" यांची जयंती निमित्त विविध उपक्रम राबविण्यासंदर्भात सूचना पारित करण्यात आलेल्या आहेत.

२. कंपनीतील सर्व संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना विनंती करण्यात येते की, शासन परिपत्रक दि.०५.०२.२०२४ मधील सूचनांचे अवलोकन करुन दिनांक १९ फेब्रुवारी, २०२४ या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंती निमित्त विविध उपक्रम राबविण्यात यावेत.

३. सबब, सोबत जोडलेल्या दि.०५.०२.२०२४ रोजीच्या शासन परिपत्रकामध्ये नमूद विविध उपक्रमांच्या अनुषंगाने कंपनीतील सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये दि.१९.०२.२०२४ या दिवशी "छत्रपती शिवाजी महाराज" यांची जयंती साजरी करण्यात यावी.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत:** शासन परिपत्रक दि.०५.०२.२०२४

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/(मासं)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(देयके व वसूली)/(वितरण)/(वित्त व लेखा) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी अधिकारी/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
५) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.परिमंडळ कार्यालय.

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंती दिनांक १९ फेब्रुवारी,२०२४ निमित्त विविध उपक्रमासंदर्भात

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग,**

**परिपत्रक क्रमांक: जपुती-२०२४/प्र.क्र.१६/कार्या-जपुक (२९)**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :०५ फेब्रुवारी,२०२४.

**संदर्भ:-**१) सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक : GAD-४९०२२/१४/२०२३-GAD (DESK-२९), दि.२७.१२.२०२३.
२) सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-१४२३/प्र.क्र.१२/ कार्या-३१ (राजशिष्टाचार),दि.०१.०२.२०२३
३) सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. जपुती-२०२३/ प्र.क्र.४२/ कार्या-२९, दि.१५.०२.२०२३.

परिपत्रक :-

या विभागाचे दिनांक २७ डिसेंबर,२०२३ परिपत्रक पहावे. सदर परिपत्रकान्वये राज्यातील राष्ट्र पुरुष/ थोरव्यक्ती यांची जयंती साजरी करण्याबाबतचे निदेश दिले आहेत.

२. शासनामार्फत दरवर्षी दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची शासकीय कार्यालयात जयंती साजरी करण्यात येते. दिनांक १९ फेब्रुवारी चे औचित्य साधून या थोरपुरुषांचे ज्या ज्या ठिकाणी पुतळे/स्मारके आहेत, तेथे यावर्षी देखील छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात यावी.

दिनांक १८.०२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता सर्व अधिकारी व संबंधित विभाग प्रमुख यांनी स्वत: पुतळा परिसराची पाहणी करुन संबंधित यंत्रणांकडून रंगरंगोटी, साफसफाई व सुशोभिकरण करुन घेऊन ते झाल्याची खातरजमा करुन घ्यावी.

३. सामान्य प्रशास विभागाच्या दिनांक ०१ फेब्रुवारी,२०२३ शासन निर्णयान्वये महाराष्ट्राच्या राज्यगीताची घोषणा करण्यात आली आहे. या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ नुसार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून सदर गीत दिनांक १९ फेब्रुवारी,२०२३ पासून महाराष्ट्राचे राज्य गीत म्हणून अंगिकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

४. तसेच, दिनांक १९ फेब्रुवारी, २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता महाराष्ट्र राज्याच्या राज्य गीताचे गायन करुन सर्व संबंधित वरिष्ठ अधिकारी व संबंधित कार्यालय प्रमुख यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करावे. तद्नंतर छोटेखानी सांस्कृतिक समारंभाचे आयोजन करण्यात यावे.

५. उपरोक्त उल्लेखित उपक्रम यशस्वीरित्या पार पाडावयाचे असल्याने, त्याचे योग्य व काळजीपूर्वक नियोजन करणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने संबंधित यंत्रणांनी दिनांक १९ फेब्रुवारी, २०२४ रोजी होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे सर्व बाबींची काटकोरपणे नियोजन करुन अंमलबजावणी करावी.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा सांकेतांक २०२४०२०५१४१०२८१८०७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

GHANSHAM JIBHAU JADHAV

Digitally signed by GHANSHAM JIBHAU JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=914f966ddb6386e4d7e8470d42c78cce723425cbba133d00e6872290d2d49ef0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C8E8DC20F7ED71575C1B77071AC41AD68149B2C52D376AA00FD9B96DA46FC1F8, cn=GHANSHAM JIBHAU JADHAV
Date: 2024.02.06 12:57:26 +05'30'

**( घ.जि.जाधव )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (गृह, विधि व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, उर्जा, राजशिष्टाचार) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अ.मु.स.(प्र.सु.,र.व का.),सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व मंत्रालयीन विभाग.
१०. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
११. सह सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग (प्रशा-४), यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता.
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ( प्रसिध्दी देण्यासाठी )
१३. सर्व विभागीय आयुक्त.
१४. सर्व जिल्हाधिकारी.
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१६. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१९. निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली
२०. निवड नस्ती ( कार्यासन-२९).